INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ

**सौ.चित्रलेखा श्रीमंत ढोले**
उपाध्यक्षा, JBVP लाखेवाडी
लाखेवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/08.2021-64112175/IRJHIS2108011

***सारांश :***

*"जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उदधारी"- या उक्तीप्रमाणे स्त्रिया शिकल्या तर कुटुंबचं नव्हे तर त्याबरोबर समाजही सुधारणार आहे. भारतीय कुटुंब व्यवस्थेत वैदिक काळापासूनचं स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान आहे. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारतीय विचारवंतांनी व समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि स्त्रियांना प्रगतीचा मार्ग दाखविला आणि त्यामुळेचं आज स्त्रिया नोकरी-व्यवसाय, शेती-उद्योग, राजकारण-समाजकारण, खेळ-प्रशासन इत्यादि एक ना अनेक क्षेत्रांमध्ये आपले कर्तृत्त्व सिद्ध करताना दिसत आहेत. असेचं विचार आज घरांघरांमध्ये रुजत गेले तर खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ भक्कमपणे रोवून तिचा झेंडा अटकेपार गेल्याशिवाय राहणार नाही.*

***महत्वाचे शब्द :*** *स्त्री शिक्षण, कुटुंब, समाज, शिक्षण, समाजसुधारक, समानता, संधी*

## प्रस्तावना :

"स्त्री ही श्रद्धा, त्याग आणि समजूतदारपणा याची मूर्ती आहे." भारतीय कुटुंब व्यवस्थेमध्ये पुरुषांपेक्षा महिलांचे योगदान अधिक महत्त्वाचे आहे. परंतु वैदिक काळापासून स्त्रियांच्या बाबतीत विषमतेची वागणूक सातत्याने दिली जात होती. शिक्षण, व्यवसाय, नोकरी, नेतृत्त्व या प्रत्येक बाबतीत स्त्रियांना नाकारले जात होते. मात्र आधुनिक काळामध्ये काही समाज सुधारक तसेच स्त्री वादी विचारवंतांमुळे आणि लोकशाही प्रणालीमुळे स्त्रियांना सर्वच क्षेत्रात समानतेची वागणूक दिली जात आहे. स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास व परिपोषण करणारे महत्त्वाचे साधन म्हणजे 'स्त्री शिक्षण' होय. 'स्त्री शिक्षण' हा समाज व्यवस्थेच्या समृद्धीचा आणि प्रगतीचा मापदंड आहे. कोणत्याही समाजाची संस्कृतिक पातळी ही त्या समाजातील स्त्रियांची परिस्थिती कशी आहे यावरून ठरते.

आधुनिक काळामध्ये प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी स्वत:चा ठसा उमटविला आहे. अगदी राजकारणापासून उद्योगांपर्यंत तर शेतीपासून अवकाशापर्यंत स्त्रियांनी स्वतःचे कर्तृत्त्व सिद्ध केले आहे. खेळामध्ये सुद्धा सानिया मिर्झा, पी.टी.उषा, साईना नेहवाल, पी.व्ही.सिंधू, मेरी कोम, इ. महिलांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटविला आहे. असे कोणतेच क्षेत्र नाही की जे महिलांनी पादाक्रांत केले नाही. आकाशाला गवसणी घालणारी कल्पना चावला, सुनिता विल्यमसम या देखील स्त्रीचं आहेत! भारत देशाच्या राजकरणाचा गाडा ओढणाऱ्या पंतप्रधान इंदिरा गांधी, देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती डॉ.प्रतिभा पाटील, तिहार जेलमधील क्रूर गुन्हेगारांवर वचक बसविणाऱ्या पोलिस अधिकारी किरण बेदी याही स्त्रियाचं आहेत. विज्ञान तंत्रज्ञानाचे प्रगत ज्ञान असूनही समाजसेवेत स्वतःला झोकून देणाऱ्य सुधा मूर्ती याही स्त्रीचं आहेत. ममतेचं, करुणेचं आणि त्यागाचं ज्वलंत उदाहरण म्हणजे मदर तेरेसा अशा एक ना अनेक क्षेत्रातील कितीतरी कर्तृत्त्ववान स्त्रीची उदाहरणे आपल्याला ज्ञात आहेत.

**स्त्री शिक्षणाची पार्श्वभूमी :**

प्राचीन काळी वेदकाळात भारतात स्त्रियांना समाजामध्ये मान होता. मुलांच्या बरोबरीने मुलींनाही आवश्यक ते शिक्षण मिळत असे. मुलीही ब्रम्हचार्य पाळून वेद विद्येचा अभ्यास करत होत्या. त्यांना वेदपठन, कर्मकांड करण्याची परवानगी होती. सुलभा, मैत्रेयी, गार्गी यांसारख्या विदुषी त्या काळात होत्या. परंतु त्यानंतर स्मृतिकाळात स्त्रीविषयक दृष्टिकोन हा पुरुषांच्या भोग,इच्छापूर्तीचे साधन एवढाचं मर्यादित होता. मुलींच्या दृष्टीने ते अंधारयुग होते. त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले गेले. पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा नाकारला होता. अगदी कुटुंबाबाहेरचे सामाजिक अस्तित्त्वही नाकारले होते. पुरुषांची व कुटुंबाची सेवा करणे हेच तिचे कर्तृत्त्व होते. पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रीला समाजात दुय्यम दर्जा होता . पुरुषांनीही आपले वर्चस्व टिकविण्याचा सातत्याने प्रयत्न केला. स्त्रीला समाजात सदैव कमी लेखल्यामुळे तिच्या मनात न्युंनगंड निर्माण होत गेला. त्यातचं समाजाने तिच्यावर जाचक अशी बंधने लादली आणि हिचं बंधने पुढे खानदानीपणाची लक्षण ठरली. स्त्रियांवरही याचं विचारांचा पगडा बसला. त्या काळात घर हेचं स्त्रियांसाठीची लक्ष्मणरेषा ठरली. पुरूषांचे दास्यत्त्व त्यांच्या नशिबी आले. रूढी परंपरा, रितीरिवाज, अंधश्रद्धा, सामाजिक बंधने यांचा पगडा दिवसेंदिवस वाढतचं गेला.

पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे कुटुंब चालविणे ही पुरुषांची जबाबदारी ठरल्यामुळे स्त्रीला घराबाहेर जाण्याची संधीचं मिळाली नाही. कुटुंबातील मुलांचे पालनपोषण, थोरामोठ्यांची सेवा, व्रतवैकल्ये या बाबींना प्राधान्य दिल्यामुळे स्त्री शिक्षणाची पिछेहाट होत गेली. स्त्री ही शारीरिक व भावनिक दृष्ट्या कमकुवत, कमी बुद्धीची अशा प्रकारची अवहेलना केली गेली. तिला नेहमीचं परावलंबी ठेवले गेले. परंतु असे असतानाही त्या काळातील काही स्त्रीवादी विचारवंतांनी या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून स्त्रीचा दर्जा उंचवण्याचा प्रयत्न केला.

**स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ :**

स्वातंत्र्यपूर्व काळातही समाजातील बंधनांना झुगारून काही विचारवंतांनी, समाज सुधारकांनी समाज प्रबोधन करण्यास सुरुवात केली. १८ व्या व १९ व्या शतकात भारतात तसेच महाराष्ट्रातही प्रबोधनाचे पडसाद उमटायला सुरुवात झाली. पाश्चिमात्य उदारमतवादी तत्त्वांचा प्रभाव भारतातील प्रबोधनावर नक्कीच पडला. 'समाज हा परिवर्तनशील, संवेदनशील, आणि अनुकरणप्रिय असल्यामुळे प्रबोधनाने परिवर्तन घडून येण्यास प्रारंभ झाला. थोडक्यात असे की, भारतीय स्त्री सुधारणेचा उत्क्रांतीवादी विचार समाजात परिवर्तन घेऊन आला आणि हाचं परिवर्तनाचा धागा पकडून समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. म.फुले, सावित्रीबाई फुले, राजाराम मोहन रॉय, बाबा पद्मनजी, महर्षी कर्वे, वि.रा.शिंदे, न्यायमूर्ती रानडे,इ.समाज सुधारकांनी स्वातंत्र्यानंतरही स्त्रियांच्या शिक्षणामध्ये आमुलाग्र बदल करून स्त्री शिक्षणाचा भक्कम पाया रचला. सर्व जाती-धर्मातील, गरीब-श्रीमंत, ग्रामीण-शहरी भागातील मुली शिक्षण घेवू लागल्या.

समाजातील स्त्री च्या दुर्दशेला शिक्षणाचा अभाव, अज्ञान व मागासलेपणा कारणीभूत होता. म्हणून स्त्रीच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी, स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी भारतातील अनेक विचारवंतांनी, समाजसुधारकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. बालविवाह, हुंडापद्धती, सतीची चाल या अनिष्ट प्रथांना विरोध केला. त्यांनी समाजाचा विरोध व जहरी टिका सहन केली आणि त्यामुळेचं आज स्त्री शिक्षणाचा प्रसार झाला आणि स्त्री पूर्वीपेक्षा मानाने वावरू लागली.

'शिक्षण' हे स्त्रियांच्या प्रगतीचे लक्षण मानले गेले. समाजातील स्त्रीवर होणारा अन्याय दूर करायचा असेल तर स्त्री शिक्षण महत्त्वाचे आहे याची जाणीव सावित्रीबाई फुले यांना झाली. म्हणूनच त्यांनी वेळप्रसंगी समाजाचे दगड, गोटे, चिखल, शेणगोळे यांचा मार सहन करून स्त्रियांना शिक्षण देण्याचा सातत्याने चालू ठेवला. स्त्री शिक्षणामुळे स्त्रीचा विकास साधला जातोच पण त्याबरोबर कुटुंबाचा दर्जा उंचवण्यास खूप मदत होते. एक सुसंस्कृत व सुसंस्कारी स्त्री कुटुंबातील सर्व घटकांना मार्गदर्शन करू शकते. तिला शिक्षणाचे महत्त्व पटल्यामुळे ती संपूर्ण कुटुंब शिक्षित आणि संस्कारीत करू शकते. मुलांची व्यक्तिमत्त्वे घडविण्यात आईचा मोलाचा वाटा असतो. त्यामुळेच नवीन सुजाण पिढी घडविण्यास मदत होत आहे. भारतातील अनेक समाजसुधारकांच्या अथक प्रयत्नांमुळे त्या काळातील कर्मठपणाच्या ओझ्याखाली दबलेली स्त्री शिक्षणामुळे ज्ञानी होऊ लागली. स्त्री ला तिच्या हक्कांची जाणीव झाली. भारतीय संविधानात स्त्री-पुरूषांना शिक्षणाची व विकासाची समान संधी प्रदान केली आहे. आजची स्त्री ही पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात

स्वतःचा ठसा उमटवत आहे. राजकारण, समाजकारण तसेच प्रशासनात मोठ-मोठी पदे भूषवित आहे. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना शिक्षणाचा मार्ग दाखविला आणि लाखो स्त्रियांनी या मार्गावर चालत आपले कर्तृत्त्व सिद्ध केले.

**समारोप :**

ज्या देशांमध्ये स्त्रियांना शिक्षणामध्ये स्वातंत्र्य व नोकरी-व्यवसायामध्ये समान संधी दिली जाते तो देश, तो समाज विकसित आणि सुसंस्कृत समाज म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्त्री शिक्षणाला चालना मिळत गेली. समाजसुधारक, समाज व शासन यांच्या एकत्रित प्रयत्नाने स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि त्यामुळे स्त्रीचे समाजातील स्थान उंचावले आहे. प्रत्येक पुरुषाने स्त्रीला शिक्षणासाठी व सामाजिक सहभागासाठी प्रेरणा दिली पाहिजे तरच स्त्री शिक्षणाचा झेंडा अटकेपार झाल्याशिवाय राहणार नाही व स्त्री-पुरुष समानता नांदल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भग्रंथ सूची :**

१. श्री. पाटील अभिजीत – ‘ स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ: ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले’ बहुजन महापुरुष ३० सप्टेंबर २०१३

२. ‘सावित्रीबाई फुले संपूर्ण माहिती’ मराठी भाऊ टीम- ४ एप्रिल २०२०.

३. गुरव चैताली- ‘भारतीय समाजातील स्त्रियांची बदलती स्थिती’ १६ नोव्हेंबर २०१५

४. बाबर सरोजिनी- ‘स्त्री शिक्षणाची वाटचाल’ मुंबई १९६८